शासन निर्णय

स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.८४७/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १८ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना :- कै.पांडुरंग मारुती सस्ते (पाटील) शैक्षणिक प्रतिष्ठाण,मोशी,ता.हवेली,जि.पुणे संचलित न्यु इंद्रायणी इंग्लिश मिडीयम स्कुल,मोशी,ता.हवेली,जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत कै.पांडुरंग मारुती सस्ते (पाटील) शैक्षणिक प्रतिष्ठाण,मोशी,ता.हवेली,जि.पुणे संचलित न्यु इंद्रायणी इंग्लिश मिडीयम स्कुल,मोशी,ता.हवेली,जि.पुणे या नवीन प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळेस ( इ.१ ली ते १२ वी , सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ. ), सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून नवीन शाळा स्थापन करण्यासाठी खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती-

१) तसेच संस्थेने प्रस्तावित शाळा शासन मंजुरीपुर्वीच सुरु केली नसल्याची संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यानी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरु केली असल्यास विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सदर शाळेकडून रुपये एक लक्ष इतका दंड वसूल करुन त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्बातल ठरेल.

४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.